**'म्हणी' म्हणजे लोकांनी वारंवार उच्चारलेले वाक्य. मराठी १५० हुन अधिक मराठी म्हणी डाउनलोड करा PDF मध्ये**

**म्हणीमध्ये जीवनातील विशिष्ट अनुभव, माहिती, सत्य व उपदेश साठवलेला असतो. म्हणीच्या विचारांत मार्मिकता असते. जे वाक्य किवा वचन वारंवार म्हणण्यात येते ती 'म्हण'होय. म्हणी समाजाचा आरसाच आहेत. मानवाच्या चांगल्या वाईट प्रवृत्ती, आचार -विचार, नानाविध चालीरीती ,निरनिराळी नातीगोती इ.चे प्रतिबिंब त्यांत पडलेले असते**

- **1. अगं अगं म्हशी मला कोठे नेशी**
  - स्वत:ची चूक मान्य करण्याऐवजी त्यासाठी इतरांवर दोष ठेवणे.
- **2. पी हळद हो गोरी**
  - उतावळेपणा दाखविणे
- **3. आपला हात जगन्नाथ**
  - आपली प्रगती आपल्या कर्तृत्वावर अवलंबून असते.
- **4. मेल्याशिवाय स्वर्ग दिसत नाही**
  - प्रत्यक्ष अनुभव घेतल्याशिवाय कळत नाही
- **5. अति तेथे माती**
  - कोणत्याही गोष्टीचा अतिरेक वाईटच असतो.
- **6. बाप दाखव नाहीतर श्राद्ध कर**
  - दोनपैकी एक पर्याय निवडणे
- **7. आयत्या बिळात नागोबा**
  - दुसऱ्याने स्वत:साठी केलेल्या गोष्टीचा आयता फायदा उठविणे.
- **8. चार दिवस सासूचे चार दिवस सुनेचे**
  - प्रत्येकाची वेळ कधीतरी येतेच
- **9. उंटावरचा शहाणा**
  - मूर्ख सल्ला देणारा
- **10. आईजीच्या जीवावर बाईजी उदार**
  - दुसऱ्याचा पैसा खर्च करून औदार्य दाखविणे.
- **11. नाचता येईना अंगण वाकडे**
  - स्वत:स चांगले काम येत नसणारा दुसऱ्याचे दोष काढतो
- **12. आपल्याच पोळीवर तूप ओढणे**
  - फक्त स्वत:चाच तेवढा फायदा साधून घेणे.
- **13. छत्तीसाचा आकडा**
  - विरुद्ध मत असणे
- **14. आंधळे दळते कुत्रं पीठ खाते**
  - एकानं काम करावं आणि दुसऱ्यांनं त्याचा फायदा घ्यावा.
- **15. तेरड्याचा रंग तीन दिवस**
  - एखादे कार्य थोडे दिवस जोरात चालून एकदम बंद पडणे
- **16. आधी पोटोबा मग विठ्ठोबा**
  - आदी पोटाची सोय पाहावी नंतर देवधर्म करावा.
- **17. अडला हरी गाढवाचे पाय धरी**
  - एखाद्या हुशार माणसाला देखील अडचणीच्या वेळी मूर्ख माणसाची विनवणी करावी लागते.
- **18. आंधळा मागतो एक डोळा, देव देतो दोन डोळे**
  - अपेक्षेपेक्षा जास्त फायदा होणे.
- **19. अति शहाणा त्याचा बैल रिकामा**
  - जो माणूस फार शहाणपणा करायला जातो. त्याचे मुळीच काम होत नाही.
- **20. आधी शिदोरी मग जेजूरी**
  - आधी भोजन मग देवपूजा
- **21. दुष्काळात तेरावा महिना**
  - संकटात अधिक भर
- **22. असतील शिते तर जमतील भुते**
  - एखाद्या माणसाकडून फायदा होणार असला की त्याच्या भोवती माणसे गोळा होतात.
- **23. नव्याचे नऊ दिवस**
  - नवेपणा असतानाचे कौतुक नंतर टिकत नही
- **24. आचार भ्रष्टी सदा कष्टी**
  - ज्याचे आचार विचार चांगले नसतात. तो नेहमी दु:खी असतो.
- **25. वासरात लंगडी गाय शहाणी**

- अडाणी लोकांत अल्प ज्ञान असणारा शहाणा ठरतो
- **26. आपला तो बाब्या दुसऱ्याचं ते कारटं**
  - स्वत:चे चांगले आणि दुसऱ्यांचे वाईट अशी प्रवृत्ती असणे.
- **27. आपण हसे लोकाला, शेंबूड आपल्या नाकाला**
  - ज्या दोषाबद्दल आपण दुसऱ्याला हसतो. तोच दोष आपल्या अंगी असणे.
- **28. रात्र थोडी सोंगे फार**
  - काम भरपूर, वेळ कमी
- **29. आधी बुद्धी जाते नंतर लक्ष्मी जाते**
  - अगोदर आचरण बिघडते नंतर दशा बदलते.
- **30 . नाकाचा बाल**
  - अत्यंत प्रिय व्यक्ती
- **31. अचाट खाणे मसणात जाणे**
  - खाण्यापिण्यात अतिरेके झाल्यास परिणाम वाईट होतो.
- **32. आई जेवू घालीना बाप भीक मागू देईना**
  - दोन्ही बाजूंनी अडचण
- **33. आलीया भोगाशी असावे सादर**
  - कुरकुर न करता निर्माण झालेली परिस्थिती स्वीकारणे.
- **34. आवळा देऊन कोहळा काढणे**
  - क्षुल्लक गोष्टीचा मोबदल्यात मोठा लाभ करून घेणे.
- **35. अंथरूण पाहून पाय पसरावे**
  - आपल्या ऐपतीप्रमाणे खर्च ठेवावा.
- **36. कामापुरता मामा**
  - काम साधण्यापुरते गोड बोलणे
- **37. आपलेच दात आपलेच ओठ**
  - आपल्याच माणसाने चूक केल्यावर अडचणीचे स्थिती निर्माण होणे.
- **38. आधीच उल्हास त्यात फाल्गुन मास**
  - मुळातच आळशी माणसाच्या आळशी वृत्तीला पोषक अवस्था निर्माण होणे.
- 39. आईचा काळ बायकोचा मवाळ
  - आईकडे दुर्लक्ष करून बायकोची काळजी घेणारा
- **40. आठ हात लाकूड अन नऊ हात ढिपली**
  - अत्यंत मूर्खपणाची अतिशयोक्ती.
- **41. अळी मिळी गुप चिळी**
  - रहस्य उघडकीला येऊ नये म्हणून सर्वांनी मूग गिळून बसणे.
- **42. अहो रूपम अहो ध्वनी**
  - एकमेकांच्या मर्यादा न दाखवता उलटपक्षी खोटी स्तुती करणे.
- **43. इच्छा तेथे मार्**
  - ग एखादी गोष्ट करण्याची इच्छा असेल तर काहीतरी मार्ग निघतोच.
- **44. इकडे आड तिकडे विहीर**
  - दोन्ही बाजूंनी अडचणीची परिस्थिती असणे.
- **45. उठता लाथ बसता बुकी**
  - प्रत्येक कृत्याबद्दल अद्दल घडविण्यासाठी पुन्हा पुन्हा शिक्षा करणे.
- **46. उडत्या पाखरची पिसे मोजणे**
  - अगदी सहजपणे अवघड गोष्टीची परीक्षा करणे.
- **47. उधारीचे पोते सव्वाहात रिते**
  - उधारी घेतलेल्या गोष्टीत तोटा ठरलेलाच असतो.
- **48. उंदराला मांजर साक्ष**
  - वाईट कृत्य करतांना एकमेकांना साक्ष देणे.
- **49. उचलली जीभ लावली टाळ्याला**
  - विचार न करता बोलणे.
- **50. उतावळा नवरा गुडघ्याला बाशिंग**
  - प्रसंगी हास्यास्पद ठरेल आशा प्रकराच्या उतावळेपणा दाखविणे.
- **51. उथळ पाण्याला खळखळाट फार**
  - थोडासा गुण अंगी असणारा माणूस जास्त बढाई मरतो.
- **52. उस गोड लागला म्हणून मुळासकट खाऊ नये**
  - कोणत्याही चांगल्या गोष्टीचा किंवा एखाद्याच्या चांगुलपणाचा प्रमाणाबाहेर फायदा घेऊ नये.
- **53. एक ना घड भारभर चिंध्या**
  - एकाच वेळी अनेक कामे करायला घेतल्यावर सर्वच कामे अर्धवट होण्याची अवस्था.
- **54. एका माळेचे मणी**

- सगळीच माणसे सारख्या स्वभावाची.
- **55. एका हाताने टाळी वाजत नाही**
  - दोघांच्या भांडणात पूर्णपणे एकट्यालाच दोष देता येत नाही किंवा एखाद्या कृत्यात दोघेही दोषी असणे.
- **56.ऐकावे जनाचे करावे मनाचे**
  - लोकांचे ऐकून घ्यावे व मग आपल्याला जे योग्य वाटेल ते करावे.
- **57. उंटावरून शेळ्या हाकणे**
  - आळस, हलगर्जीपणा करणे
- **58. एका म्यानात दोन तलवारी राहू शकत नाहीत**
  - दोन तेजस्वी माणसे एकत्र गुण्यागोविदाने नांदू शकत नाहीत दोन सवती एका घरात सुखासमाधानाने राहू शकत नाहीत.
- **59. कावळ्याच्या शापाने गाय मरत नाही**
  - क्षुद्र माणसांच्या निंदेने थोरांचे नुकसान होत नाही
- **60. घोडामैदानजवळ असणे**
  - परीक्षा लवकरच होणे
- **61. ओळखीचा चोर जीवे न सोडी**
  - ओळखीचा शत्रू हा अनोळखी शत्रूपेक्षा धोकादायक असतो.
- **62. कर नाही त्याला डर कशाला**
  - ज्याने काही गुन्हा किंवा वाईट गोष्ट केली नाही त्याने शिक्षा होण्याचे भय कशाला बाळगावयाचे
- **63. कामापुरता मामा**
  - ताकापुरती आजी आपले काम करून घेईपर्यंत एखाद्याशी गोड बोलणे.
- **64. काळ आला होता. पण वेळ आली नव्हती**
  - नाश होण्याची वेळ आली असताना थोडक्यात बचावणे.
- **65. कानामगून आली आणि तिखट झाली**
  - मागून येऊन वरचढ होणे.
- **66. नाव मोठे लक्षण खोटे**
  - कीर्ती मोठी पण कृती छोटी
- **67. करावे तसे भरावे**
  - जसे कृत्य असेल त्याप्रमाणे चांगलेवाईट फळ भोगावे लागते.
- **68. हपापाचा माल गपापा**
  - लोकांचा तळतळाट करून मिळवलेले धन झपाट्याने नष्ट होते
- **69. कधी गाडीवर नाव तर कधी नावेवर गाडी**
  - कधी गरीबी तर कधी श्रीमंती येणे.
- **70. कुन्हाडीचा दांडा गोतास काळ**
  - आपलाच माणूस आपल्या नाशाला कारणीभूत होतो.
- **71. काठी मारल्याने पानी दुभंगत नाही**
  - रक्ताचे नाते तोडून म्हणता तुटत नाही.
- **72. कडू कारले तुपात तळले**
  - साखरेत घोळले तरीही कडू ते कडूच किती ही प्रयत्न केला तरीही माणसाचा मूळ स्वभाव (दूर्वर्तणी) बदलत नाही.
- **73. कुडी तशी पुडी**
  - देहाप्रमाणे आहार असतो.
- **74. कधी तुपाशी तर कधी उपाशी**
  - संसारिक स्थिती नेहमी सारखीच राहत नाही त्यात कधी संपन्नता येते तर कधी विपन्नावस्था येते.
- **75. कावळा बसायला अन फांदी तुटायला**
  - परस्परांशी कारण-संबंध नसताना योगायोगाने दोन गोष्टी एकाचवेळी घडणे.
- **76. कुत्र्याचे शेपूट नळीत घातले तरी वाकडे ते वाकडेच**
  - कितीही प्रयत्न केले तरी काहीचा मूळस्वभाव बदलत नाही.
- **77. कुंपणाने शेत खाल्ले तर दाद न्यावी**
  - कुणीकडे रखवालादारानेच विश्वासघात करून चोरी करणे.
- **78. कोल्हा काकडीला राजी क्षुद्र**
  - माणसे क्षुद्र गोष्टीनीही खुश होतात.
- **79. कोरड्याबरोबर ओले ही जळते**
  - निरपराध्याची अपराध्यासोबत गणना करणे
- **80. कोंबडे झाकले म्हणून तांबडे फुटायचे राहत नाही**
  - निश्चित घडणारी घटना कोणाच्याही प्रयत्नाने टाळता येत नाही.
- **81. काखेत कळसा नि गावाला वळसा**
  - हरवलेली वस्तु जवळ असतानाही इतरत्र शोधत राहणे.
- **82. कावळ्याच्या शापाने गाय मरत नाही**
  - क्षुद्र माणसांनी केलेल्या दोषा रोपाने थोरांचे नुकसान होत नसते.
- **83. खाण तशी माती**

- आई वडिलांप्रमाणे त्यांच्या मुलांचे वर्तन होणे.
- **84. खऱ्याला मरण नाही**
  - खरे कधी लपत नाही, सत्य मेव जयते!
- **85. खाऊ जाणे ते पचवू जाणे**
  - एखादे कृत्य धाडसाने करणारा त्याचे परिणाम भोगण्यासही समर्थ असतो.
- **86. खाईन तर तुपाशी नाहीतर उपाशी**
  - परिस्थितीशी जुळवून न घेता हट्टीपणाने वागणारा.
- **87. खाऊन माजवे टाकून माजू नये**
  - पैशाच्या संपतीचा गैरवापर करू नये.
- **88. खोट्याच्या कपाळी गोटा**
  - वाईट कृत्य करणाऱ्याला माणसाचे शेवटी वाईटच होते.
- **89. गरजवंताला अक्कल नसते**
  - गरजेमुळे अडलेल्या व्यक्तीला इतरांच्या म्हणण्यापुढे मान डोलवावी लागते.
- **90. गर्वाचे घर खाली**
  - गर्विष्ठ माणसाची कधीतरी फजिती होतेच.
- **91. गरज सरो नि वैध मरो**
  - आपले काम झाले की उपकार कर्त्याची पर्वा न करणे.
- **92. गर्जेल तो पडेल**
  - काय केवळ गाजावाजा करणाऱ्या व्यक्तीच्या हातून फारसे काही घडत नसते.
- **93. गाढवाला गुळाची चव काय?**
  - मुर्खाला चांगल्या गोष्टीची किंमत कळत नाही.
- **94. गाढवांचा गोंधळ, लाथांचा सुकाळ**
  - मूर्ख लोक एकत्र आल्यावर मूर्खपणाचेच कृत्य करणार
- **95. गाव करी ते राव ना करी श्रीमंत**
  - व्यक्ति स्वत:च्या बळावर जे करू शकत नाही ते एकीच्या बळावर सामान्य माणसे करू शकतात.
- **96. गाड्याबरोबर नळ्याची यात्रा**
  - मोठ्यांच्या आश्रयाने लहानांचाही फायदा होतच असतो.
- **97. गाढवापुढे वाचली गीता अन कालचा गोधळ बारा होता**
  - मूर्खाला केलेला उपदेश वाया जातो.
- **98. गाजराची पुंगी वाजली तर वाजली नाही तर मोडून खाली**
  - एखादी गोष्ट साध्य झाली तर उत्तमच नाही तर तिचा दूसरा उपयोग करून घेणे.
- **99. गाढवाच्या पाठीवर गोणी**
  - एखाद्या गोष्टीची अनूकुलता असून उपयोग नाही. तर तिचा फायदा घेता यायला हवा.
- **100. गुरुची विद्या गुरूला फळली**
  - एखाद्याचा डाव त्याच्यावरच उलटणे.
- **101. गुळाचा गणपती**
  - गुळाचाच नैवेद्य ज्याची वस्तु त्यालाच भेट देणे.
- **102. गोगलगाय नि पोटात पाय**
  - एखाद्याचे खरे स्वरूप न दिसणे.
- **103. गोरागोमटा कपाळ**
  - करंटा दिसायला देखणा पण नशिबाने दुर्दैवी व्यक्ती.
- **104. घर ना दार देवळी बिऱ्हाड**
  - बायको पोरे नसणारा एकटा पुरुष किंवा शिरावर कोणतीही जाबाबदारी नसलेली व्यक्ती.
- **105. घर फिरले म्हणजे घराचे वासेही फिरतात**
  - एखाद्यावर प्रतिकूल परिस्थिती आली म्हणजे सारेच त्याच्याबरोबर वाईटपणे वागू लागतात.
- **106. घरचे झाले थोडे, व्याह्याने धाडले घोडे**
  - स्वत:च्या कामाचा व्याप अतोनात असताना दुसऱ्यांने आपलेही काम लादणे.
- **107. घर पहावे बांधून लग्न पहावे करून**
  - अनुभवाने माणूस शहाणा होतो.
- **108. घटका पाणी पिते घड्याळ टोले खाते**
  - आपापल्या कर्मानुसार परिणाम भोगावे लागतात.
- **109. घरोघरी मातीच्याच चुली**
  - सर्वत्र सारखीच परिस्थिती अनुभवास येणे.
- **110. घोडे खाई भाडे**
  - धंद्यात फायद्यापेक्षा खर्च जास्त.
- **111. चढेल तो पडेल**
  - गर्विष्ठ माणसाचा गर्व उतरल्याशिवाय राहत नाही.
- **112. चालत्या गाडीला खीळ**

- व्यवस्थीत चालणाऱ्या कार्यात अडचण निर्माण होणे.
- **113. चमत्काराशिवाय नमस्कार नाही,**
  - पराक्रमावाचून पोवाडा नाही लोकांना काही विशेष कार्य करून दाखविल्याशिवाय लोक मान देत नाहीत.
- **114. चिंती परा येई घरा**
  - दुसऱ्याबदल मनात वाईट विचार आलेकी स्वत:चेच वाईट होते.
- **115. चोर सोडून सान्याशाला फाशी**
  - खऱ्या गुन्हेगाराला शासन न करता दुसऱ्याच निरपराध माणसाला शिक्षा देणे.
- **116. चोराच्या उलटया बोंबा**
  - स्वत:च गुन्हा करून दुसऱ्यावर आळ घेणे.
- **117. चोराच्या मनात चांदणे**
  - वाईट माणसांनाच वाईट माणसांच्या युक्त्या कळतात.
- **118. चोरावर मोर**
  - एखाद्या गोष्टीच्या बाबतीत दुसऱ्यावर कडी करणे.
- **119. जळत्या घराचा पोळता वासा**
  - प्रचंड नुकसानीतून जे वाचले ते आपले म्हणून समाधान मानावे.
- **120. जलात राहुन माशांशी वैर करू नये**
  - ज्यांच्या सहवासात राहावे लागते त्यांच्याशी वैर करून नये.
- **121. जन्माला आला हेला, पाणी वाहून मेला**
  - निरक्षर किंवा निर्बुद्ध माणसाचे आयुष्य शारीरिक कष्टामध्येच जाते.
- **122. जळत घर भाड्याने कोण घेणार**
  - नुकसान करणाऱ्या गोष्टीचा स्वीकार कोण करणार.
- **123. जावे त्याच्या वंशा तेव्हा कळे दुसऱ्याच्या स्थितीत**
  - आपण स्वत:जावे, तेव्हा तिचे खरे ज्ञान आपणास होते.
- **124. ज्या गावाच्या बोरी त्याच गावच्या बाभळी**
  - एकमेंकाचे वर्म माहीत असणाऱ्या माणसांशी गाठ पडणे.
- **125. ज्याचे खावे मीठ त्याचे करावे निट जो**
  - आपल्या वर उपकार करतो त्या उपकार कर्त्याला स्मरण करून त्याच्या यशासाठी प्रयत्न करावेत.
- **126. जशी देणावळ तशी धुणावळ**
  - मिळणाऱ्या मोबदल्याच्या प्रमाणातच काम करणे.
- **127. ज्याचे करावे बरे तो म्हणतो माझेच खरे**
  - एखाद्याचे भले करायला जावे तर तो विरोधच करतो व आपलाच हेका चालवतो.
- **128. जी खोड बाळ ती जन्मकळा**
  - लहानपणीच्या सवयी जन्मभर टिकतात.
- **129. ज्याच्या हाती ससा तो पारधी**
  - ज्याला यश मिळाले तो कर्तबगार
- **130. जित्याची खोड मेल्याशिवाय जात नाही**
  - मूळचा स्वभाव आयुष्यात कधीच बदलत नाही.
- **131. जिच्या हाती पाळण्याची दोरी ती जगाते उद्धरी**
  - मातेकडून बालकावर सुसंस्कार होतात म्हणून ते भविष्यात कर्तुत्ववान ठरते.
- **132. झाकली मूठ सव्वा लाखाची**
  - व्यंग गुप्त ठेवणेच फायद्याचे असते.
- **133. टाकीचे घाव सोसल्याशिवाय देवपण येत नाही**
  - कष्ट केल्याशिवाय मोठेपणा मिळत नाही.
- **134. टिटवी देखील समुद्र आटविते**
  - सामान्य क्षुद्र वाटणारा माणूस प्रसंगी महान कार्य करू शकतो.
- **135. डोळ्यात केर आणि कानात फुंकर**
  - रोग एक आणि उपचार दुसराच
- **136. डोंगर पोखरून उंदीर काढणे**
  - प्रचंड परिश्रम घेवूनही अल्प यश प्राप्ती होणे.
- **137. तंटा मिटवायला गेला गव्हाची कणिक करून आला**
  - भांडण मिटविण्याऐवजी भडकावणे.
- **138. तळे राखील तो पाणी चाखील**
  - आपल्याकडे सोपविलेल्या कामाचा थोडाफार लाभ मिळविण्याची प्रत्येकाची प्रवृत्ती असते.
- **139. ढवळ्या शेजारी पवळ्या बांधला वाण नाही पण गुण लागला वाईट**
  - माणसाच्या सहवासामध्ये चांगला माणूसही बिघडतो.
- **140. ताकापुरते रामायण**
  - आपले काम होईपर्यंत एखाद्याची खुशामत करणे
- **141. तोंड दाबून बुक्यांचा मार**

- एखाद्याला विनाकारण शिक्षा करणे आणि त्याला त्याबद्दल तक्रार करण्याची मागेही बंद करणे.

- **142. तेल गेले तूप गेले आणि हाती धुपाटणे राहिले**
  - फायद्याच्या दोन गोष्टीमधून मूर्खपणामुळे एकही गोष्ट साध्य न होणे.
- **143. कावीळ झालेल्याला सगळे जग पिवळे**
  - पूर्वग्रहदूषित किंवा स्वत: वाईट प्रवृत्ती असलेल्या माणसांना सगळीकडे दोषच दिसत असतात.
- **144. गाता गळा, शिंपता मळा**
  - जबाबदारी पेलण्याचे सामर्थ्य व कौशल्य प्रत्यक्ष स्वतः पेलल्याशिवाय येत नाही .
- **145. असे साहेब किती, सांमटीत हिंडे राती.**
  - नावाचे साहेब कितीतरी असतात पण त्यांचा काही उपयोग नसतो.
- **146. अर्धी टाकून सगळीकडे धावू नये.**
  - संबध वस्तू मिळेल या आशेवर अर्धी मिळत असेल तर ती टाकू नये.
- **147. अर्थी दान महापुण्य**
  - गरजू माणसाला दान दिल्यामुळे पुण्य मिळते.
- **148.अन्नाचा येतो वास, कोरीच घेते घास.**
  - अन्न न खाणे पण त्यात मन असणे.
- **149. उडाला तर कावळा, बुडाला तर बेडूक**
  - एखाद्या गोष्टीची परीक्षा होण्याकरिता काही काल वाट पहावी लागते.
- **150. देखल्या देवा दंडवत**
  - वरकरणी, खोटे खोटे केलेले स्वागत

**मराठी म्हणी PDF मध्ये डाउनलोड करा .**

मराठी म्हणी PDF

**मराठी म्हणी व वाक्यप्रचार पुस्तक PDF मध्ये फ्री डाउनलोड करा 1600 हुन अधिक म्हणी** : **संपूर्ण मराठी म्हणी व वाक्यप्रचार**